विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संचालक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| प्रकाशक | : | सध्दर्म प्रकाशन |
| प्रकाशन वर्ष | : | १९७८ |
| वर्ष | : | तेरावें |
| अंक | : | तिसरा |
| पृष्ठे | : | १६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ४६**

Registered with the Registrar of News-papers for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

# सद्धर्म

त्रै मा सि क

संचालक
गुंडोपंत हरिभक्त

वर्ष तेरावें
अंक तिसरा
आषाढ १९००
जुलै १९७८
ऐच्छिक देणगी
किमान
दोन रुपये

## कालाय तस्मै नमः....

"The unexamined life is not worthliving.

—Socrates.

" आत्मपरीक्षण न करणारांचें जीवन व्यर्थ होय. "

सॉक्रेटिस म्हणतो त्याप्रमाणे आत्मपरीक्षण करण्याचें तर बाजूलच राहिलें, पण स्वस्थपणे बसून आपली बुद्धि स्वतंत्रतेनें विचार करण्याचे कामीं आणण्याची ताकदही कुणाच्या ठायीं आज उरलेली नाहीं. रेडियो आणि वर्तमानपत्रें चमच्या चमच्यानें आमच्या तोंडांत घालतील तेवढ्याच काय त्या खाद्या-वर जगायचें आज आम्हाला ठाऊक आहे.

|| कालाय तस्मै नमः ||

सद्धर्म प्रकाशन कार्यालय
९ ओवेनडन रोड मुंबई नं. ७
फोन ३५८४१३
भेटण्याची वेळ : सकाळी ९ ते १०

## या तिसऱ्या अंकात....

१. ब्रह्म सनातन उघडं ग ... २
२. सेवेसीं श्रुत होय ... २
३. सगुण पूजेचें खरें उद्दिष्ट ... ३
४. केवळ स्वतःचाच विचार करणारा ८
५. सूत हवेंत उभें राहिलें ... ९
६. अविस्मरणीय व्यक्ति ... १०
७. आमचं जगणं अनंतांत ... १२
८. गरज सबसे प्यारी ... १३
९. शुद्ध आणि निरपेक्ष ... १४
१०. राजाच्या डोक्यांत अंजन ... १५
११. मुक्ति हवी आहे ना ? ... १६
१२. आपली शब्दसंपदा ... १६

देणगी मनीऑर्डरनें धाडण्याचा पत्ता.
श्रीधर भालचंद्र आणि कंपनी
कापडाचे व्यापारी
४८ प्रार्थना समाज नाका
गिरगांव, मुंबई ४.

# ब्रह्म सनातन उघडं ग....

बाळकृष्णाला उद्देशून म्हटलेलें एक गीत जनाबाईच्या गाथेंत आहे. त्याचें ध्रुवपद,

"माझें अचडें बचडें छकुडें गे राधे रुपडें ।
पांघरूं घालीती कुंचडें ॥ ध्रु. ॥

असें आहे.

तेच लाडिक लाडिक शब्द असलेले मध्वमुनीश्वरांचे पुढील मनोहर गीतही पाहाण्यासारखें आहे. मुनी म्हणतात,

"माझं अचडं बचडं छकडं ग । माझं. ॥ ध्रु ॥
विकसित पंकज लोचन ज्याचे ।
जननि म्हणे हें चिपडं ग ॥ माझं. ॥ १ ॥
त्रिभुवनपालक बालक त्याला ।
पांघरविते धोंगडं ग ॥ माझं ॥ २ ॥
अंगणिं रांगत मंजुळ बोलत ।
माझं सोन्याचं ठिगडं ग ॥ माझं ॥ ३ ॥
मध्वमुनीश्वर खेळवि अंकीं ।
ब्रह्मसनातन उघडं ग ॥ माझं ॥ ४ ॥

अपत्यप्रेम ओसंडत असलेली यशोदा उघड्या-नागड्या बाळकृष्णाला पांघरूण घालून मांडीवर कौतुकानें लाडक्या लाडक्या शब्दांनी आंजारून गोंजारून खेळवीत असे. बिचारीला काय ठाऊक की प्रत्यक्ष 'ब्रह्मसनातन च' आपल्या मांडीवर आहे!

आपलीही अवस्था यशोदेसारखीच आहे. मायेनें आवृत झाल्यानें, आपण 'माझा, माझा' म्हणून प्रपंचाला कवटाळून असतों; पण त्या प्रपंचात व्याप्त असलेल्या खऱ्या 'सत्याची' आपल्याला जाणीव नसते.

ती करून घेण्याचें अनुसंधान ठेवून जीवनाचा विचार करण्यांतच विवेक आहे.

# सेवेसी श्रुत होय....

आमच्या गेल्या म्हणजे एप्रिल १९७८ च्या अंकाच्या मुखपृष्ठावर नजरचुकीनें वर्ष बारावें असें छापलें गेलें आहे. तें 'वर्ष तेरावें' असें बदलण्याची कृपा करावी.

सद्धनांसाठी चेक वा पोस्टल ऑर्डर धाडताना "सौ. माल्तीबाई नवाथे ट्रस्ट" या नांवानें त्या अशाच्यात बाहेरगांवच्या चेकसाठी आम्हाला वटवणावळ फार द्यावी लागते हे ध्यानांत ठेवून मुंबईतील बँकेच्या नांवचेच चेक धाडावेत ही विनंती.

सत्यनारायणाच्या कथेची पोथी या अंकाबरोबर आपणाकडे विनामूल्य भेट म्हणून धाडली जात आहे. कुणास त्याच्या पूजेची पोथी हवी असेल तर त्यासाठी पोस्टेज व इतर खर्च म्हणून रु. दोन मनी-ऑर्डरनें धाडून द्यावेत. रु. दोनची पोष्टाची तिकिटें धाडलीं तरी चालतील. पोथी साध्या बुकपोस्टानें धाडली जाईल.

# सगुण पूजेचें खरें उद्दिष्ट....

''ॐ उत्तिष्ठ उत्तिष्ठ देवेश । उत्तिष्ठ भुवनेश्वर ॥
उत्तिष्ठ जगदाधार । त्रैलोक्यं मंगलं कुरु ॥''
त्रैलोक्यं मंगलं कुरु । त्रैलोक्यं मंगलं कुरु ॥

कांहीं अपवाद वगळले असतां, सुदैवाने आपण अजून तरी आस्तिक्य बुद्धीचे अतएव, देव आहे, असें मानणारे आहोंत.

अपवादात्मक जे कांहीं लोक आपल्यांत आहेत, त्यांचे सर्वसाधारणपणें दोन वर्ग आहेत. त्यांपैकीं जो एक मोठा वर्ग आहे, त्यांतील लोकांच्या वृत्तीचें गमक असणारी पुढील हकीकत मनोरंजक होईल :

आपल्या जुन्या आठवणी सांगताना, बऱ्याच वर्षांपूर्वी गुरुवर्य आजगांवकर म्हणाले होते :

''त्याकाळीं मी चित्रमय कचेरीत काम करीत असें. हरीभाऊ पुणें म्युनिसिपाल्टीचे अध्यक्ष होते. त्यांचा माझ्यावर फार लोभ होता. एकदा सकाळच्या वेळीं मी काम करीत बसलों असतां, हरीभाऊ तेथें आले आणि मला म्हणाले, 'आजगांवकर, तुम्हाला वेळ आहे का ? असेल, तर माझ्याबरोबर चला. आज आपण थोडी मोकळी हवा खाऊं.''

''हातांतील मुद्रांचें बिंडोळें मी बाजूला ठेवलें आणि त्यांच्याबरोबर कचेरीबाहेर पडलों.

''म्युनिसिपाल्टीचे अध्यक्ष या नात्यानें घोड्याची उमदी बग्गी त्यांचे तैनातीस असे. ती बाहेर उभी होती. आम्ही दोघे तिच्यांत बसलों बग्गी गावाबाहेर येरवड्याच्या रस्त्याला लागली आणि आमचें हवा 'खाणें' सुरू झालें.

''थोडे दूर गेल्यावर, वाटेत बाजूला शंकराचें एक पडकें देऊळ लागलें. तेव्हां हरीभाऊंनी कोचमनला बग्गी थांबवण्यास सांगून, ते मला म्हणाले, 'आजगांवकर, येता का ? चला आपण आज शंकराचें दर्शन घेऊं''

''मी मुकाट्यानें त्यांच्या मागोमाग देवळांत गेलों.

''आंत जातांच हरिभाऊंनी प्रथम पूर्वापारपद्धतीनें शंकरापुढल्या नंदीला' स्पर्श केला आणि मग दोन्ही गाल फुगवून उजव्या हाताच्या बोटांनीं त्यांतून त्यांनीं डमरूसारखा ध्वनी काढला. नंतर पिंडीला नमस्कार करून ते बगींत जाऊन बसले. मी ही त्यांच्या मागोमाग तिच्यांत जाऊन बसलों आणि ती येरवड्याकडे जाऊं लागली. आज हरिभाऊंना तेथील एका प्रायमरी शाळेची 'तपासणी' करायची होती.

''बराच वेळ आम्ही दोघेही स्तब्ध होतों. मग मी हरिभाऊंना म्हटलें, 'हरीभाऊ, देवळांत तुम्ही नंदीला 'स्पर्श' करून गालांतून जो ध्वनी काढलात, तसल्या गोष्टीवर तुमचा खरेंच विश्वास आहे का ?'

''हरीभाऊंनीं, त्यांच्या नेहमीच्या पद्धतीनें अत्यंत गंभीरपणें उत्तर दिलें, 'अहो आजगांवकर, देव असलाच तर माझा तो प्रकार रुजू होईल; आणि नसलाच, तर माझें त्यांत काय खर्च झालें ?' ''

सुरवातीस वर्णन केलेल्या बहुसंख्य अपवादात्मक लोकांची देवाविषयींची वृत्ति, हरीभाऊंच्या वरील उत्तरांत दिसून येते, तशा प्रकारची आहे. त्यांचा देवावर विश्वास आहे आणि नाही ही. त्यांच्या मनाची अवस्था

---

१. सद्धर्म, एप्रिल १९७४, 'प्रथम नंदीचें दर्शन' पहावें.

खरोखरीच शंकराच्या डमरूसारखी आहे. त्याला दोन्हीही बाजूंनीं वाजवितां येतें. असो.

आतां अपवादात्मक लोकांचा जो दुसरा पण लहान वर्ग आहे, ते लोक स्वतःला कट्टर नास्तिक म्हणवितात. पण खरें म्हणजे देव आणि Superstition हीं एकच, अशी त्यांची समजुत असते आणि त्या विषयाचा त्यांनीं मुळींही विचार केलेला नसतो.

या नास्तिकांना उद्देशून, स्वामी विवेकानंद म्हणाले आहेत कीं,

"कोणताही हिंदु नास्तिक होईल, असें मला वाटत नाही. युरोपीय ग्रंथांच्या वाचनानें तो काही काळ चार्वाकवादी झाल्यासारखा दिसेल; तथापि त्याच्या चित्तावरील तें पटल फारच थोडा वेळ टिकेल. चार्वाकवाद अथवा निरीश्वरवाद... हें आमच्या रक्तांतच नाहीत. ज्या कल्पना तुमच्या हाडींमासीं खिळलेल्या नाहींत, त्या तुम्हाला कधींही आपल्याशा करतां येणार नाहींत. त्या तुम्ही आपल्या करूं पाहाल, तर तुमची फसगत मात्र होईल. म्हणून तसल्या कल्पनांच्या मागें लागणें सोडून द्या."

हा उतारा मनन करण्यासारखा आहे. असो.

आतां आपण आपल्या मूळ मुद्याकडे वळूं. तो म्हणजे आपण बहुतेक सर्व आस्तिक्य बुद्धीचे आहोंत; श्रद्ध आहोंत हा होय. आपला पंथ, संप्रदाय वा जातगोत कोणतीही असोत, कुठेंही आणि कोणताही देव दिसला कीं आपलें मस्तक श्रद्धेने सहजच त्याच्यापुढें नत होतें. जगाचा कर्ता, धर्ता व हर्ता असा सर्वसत्ताधारी 'देव आहे,' ही श्रद्धा आपल्या हाडींमासीं खिळलेली[२] आणि रक्तांत भिनलेली आहे. आपल्या जीवनाचा तो एक भाग आहे.

या संदर्भात श्रीमद्भागवत पुराणांत एक अत्यंत महत्त्वाचा श्लोक आहे; तो असा :

"एक एव पुरा वेदः प्रणवः सर्ववाङ्मयः।
देवो नारायणो नान्य एकोऽग्निर्वर्ण एव च ॥

९–१४–४८

पुरा म्हणजे पूर्वीच्या काळीं[३] नारायण हा एकच देव होता, त्या व्यतिरिक्त अन्य देव नव्हते, असें या श्लोकांत स्पष्टपणें म्हटलेलें आहे.

आतां, नारायण म्हणजे सर्वांच्या अंतर्यामीं असणारा परमात्मा, हें आपणास त्या शब्दाच्या व्युत्पत्तीवरून[४] ठाऊक आहे. तेव्हां भागवतकारांच्या वरील विधानाचा आशय हा होतो कीं, पूर्वीच्या काळीं परमात्मा हा एकच देव मानला जात असे. एका परमात्म्याची च लोक त्याकाळीं आराधना करीत असत, हें त्यावरून उघड आहे.

पण परमात्मा निर्गुण निराकार असल्यानें त्याची आराधना करणें अत्यंत विकट आहे. ती सुकर व्हावी एतदर्थ, नंतरच्या काळांत त्याची इंद्रियगोचर अशीं प्रतीकें[५] बनवून, पूजाअर्चा, सेवा, नामस्मरण, गुणगायन व

२. म्हणूनच, "India is a land and a people intoxicated with God." असें Lin Yutang सारखे परकीय लोक आश्चर्यानें म्हणतात.– The Wisdom of China and India, preface to the Hymns from the Rigveda.

३. त्रेतायुगांत.

४. सद्धर्म, जुलै-ऑक्टोबर, १९७४ पृष्ठ ३.

५. "निर्गुण होतें तें सगुण पैं झालें ।
विसरोनी गेले आपआपणा ॥"
—संत चोखामेळा

निदिध्यास इत्यादींनीं त्या प्रतीकांची आराधना सुरू झाली.

श्रद्धायुक्त अंतःकरणानें आणि मनःपूर्वक त्यांची आराधना केल्यानें साधकाच्या अंतर्यामीं त्या प्रतीकांच्या बद्दल आवड व प्रेम निर्माण होई आणि तसें झालें म्हणजे त्याचें मन साहजिकच त्या प्रतीकांच्या ठायीं अधिकाधिक रमूं लागून, त्याची देहबुद्धी व तज्जन्य कामक्रोधादि विकार कमी होऊं लागत; आणि ते तशा प्रकारें कमी झाले म्हणजे साहजिकच त्याचें मन त्या प्रतीकांचे ठायीं अधिकाधिक स्थिरावूं लागे.

अशा प्रकारें अन्योन्यसंवर्धक अशी ही क्रिया वाढत गेली म्हणजे, साधक आपली देहबुद्धि आणि विकार पूर्णतया विसरून त्या प्रतीकांशीं तादात्म्य पावे आणि परिणामी परमात्मा आपल्या अंतर्यामीच असल्याचा अंततः त्याला अनुभव[६] येई.

ही पराकोटीची अवस्था प्राप्त करून घेणें अर्थातच, श्री ज्ञानेश्वर नामदेवादिसारख्या महात्म्यांनां च शक्य आहे. पण असें असलें तरीही, सर्वसामान्य साधक आपल्या कुवतीनुसार या सगुण उपासनेचा प्रामाणिकपणें अवलंब करील, तर त्यामुळें त्याच्याही अंतःकरणांत आपल्या आराध्यदैवताबद्दल भक्ति आणि प्रेम निर्माण होऊन त्यापायीं त्याच्या देहबुद्धी आणि कामक्रोधादि विकारांना आळा बसेल, त्याची बुद्धि शुद्ध होईल आणि त्याला सर्वांविषयीं आत्मीयता वाटूं लागून त्याचें जीवन कमी अधिक प्रमाणांत सुखी आणि आनंदमय बनेल.

अशा प्रकारचे साधक आजही आपल्या समाजांत, तुरळक कां होईना, पण अस्तित्वांत असल्याचें दिसून येतें. त्यांच्या जीवनाचें बारकाईनें निरीक्षण केल्यास वरील म्हणण्याची सत्यता पटेल.

सगुण उपासनेचें रहस्य यांतच आहे. समाजांत सुखशांतीचा प्रसार करण्याचे कामी ती अत्यंत उपयुक्त आहे. आरआपल्या मगदुराप्रमाणें ती सर्वांच्याच आटोक्यांत असणारी आहे. आणि म्हणूनच धर्माचें तें एक प्रधान अंग मानण्यात आलें आहे.

पण कोणतीही लोकोपयोगी संस्था निर्माण झाली कीं तिचा आपल्या स्वार्थासाठी तुं येदिकतपणें फायदा करून घेशील, असा ब्रह्मदेवाचा आपल्याला शाप च आहे कीं काय कोण जाणें! या सगुण उपासनेच्या बाबतीतही तीच गत झालेली आहे. देव सर्वसत्ताधीश आहे. त्याच्या आज्ञेविना पानही हालत नाही, या श्रद्धेचा लाभ उठवून, परमात्मा सर्वांच्या अंतर्यामीच[७] आहे, या मूळ निष्ठेला डोळ्याआड करून, त्याच्या देवतारूपी प्रतीकांनाच आतां आपण स्वयंभू बनविलें आहे आणि प्रपंचातील सर्व प्रकारच्या बऱ्यावाईट गोष्टी त्यांच्या कृपेनें प्राप्त करून घेण्यासाठीं त्यांचीच उपासना सुरू केली आहे.

परिणामीं त्या देवता आतां आपल्या घरांतील देव्हारे, गांवांतील देवळें आणि दूरदूरचीं तीर्थक्षेत्रें यांत अडकून पडल्या आहेत आणि आपल्या ठायीं असणारे रागलोभ मत्सर हेवादेवा-वगैरे सर्व प्रकारचे बरेवाईट विकार त्यांना मुक्तहस्तें बहाल करून घर

६. सद्धर्म, जानेवारी १९७७, पृ. १२-१३.

७. म्हणूनच त्याला विष्णुसहस्रनामांत 'भूतावासः' (क्र. ७०८) हें नांव दिलें आहे.

अत्यंत हिणकसपणाची वाणिज्यवृत्तीही त्यांच्या माथीं मारून आपण आपल्या प्रापंचिक वृद्धीसाठीं त्यांच्याशीं व्यापारी देवघेव सुरू केली आहे!

म्हणजे परमेश्वर आपल्या अंतर्यामीं आहे, अशी निष्ठा साधकाच्या ठायीं प्रसृत करून, त्याच्या देहबुद्धीला आणि कामक्रोधादि विकारांना आळा घालून त्याला अंततः सुखशांतीचा लाभ व्हावा, एतदर्थ जीं प्रतीकें मुळांत निर्माण झालीं, त्या प्रतीकांनाच आतां, साधकाच्या प्रापंचिक इच्छांची पूर्ती करून देऊन त्याची देहबुद्धी आणि कामक्रोधादि विकार यांत भर टाकण्यास साधनीभूत होत असणाऱ्या क्षुद्र देवतांचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे!

सगुण उपासनेची ही निव्वळ विटंबनाच नव्हे का? एखाद्या संस्थेची विकृती ती याहून अधिक काय होणार!

याचें ढळढळित उदाहरण, म्हणजे सध्यां प्रचलित असलेली सत्यनारायणाची पूजा आणि तिच्या अनुषंगानें वाचण्यात येणारी कथा हें होय.

ही पूजा व कथा फार तर दीड दोनशें वर्षांची असेल. त्या पूर्वीच्या धार्मिक वा अन्य वाङ्मयांत तिचा उल्लेख आढळून येत नाहीं. कुठे असलाच तर तो प्रक्षिप्त आहे हें, "सत्यनारायण : शोध आणि बोध" या लेखांत (सद्धर्म, जुलै १९६७ व जानेवारी १९७५) आम्ही दाखवून दिलेलें आहे.

या पूजेचा उल्लेख पूर्वकालीन वाङ्मयांत नाहीं, एवढेंच नव्हे तर, नुसतें सत्यनारायण हें नांवही त्यांत कोठें आढळून येत नाहीं. विष्णुसहस्रनामांत सत्यधर्मपराक्रम (क्रमांक २८९), सत्यसंध (५१०), सत्यधर्मपरायण (८७०), सत्यमेधा (७५९) अशीं सत्य शब्दाशीं संलग्न असलेली नांवें आहेत; त्यांत नुसतें 'सत्य'ही आहे आणि 'नारायणही' आहे. पण सत्यनारायण हें जोड नांव विष्णूच्या हजार नांवांत एकदाही आलेलें नाहीं. अशा स्थितीत हा सत्यनारायण कुठून आला आणि सत्यनारायण ही देवता कशी उपस्थित झाली, हा प्रश्न साहजिकच उद्भवतो.

तिच्या पूजेला लागणारी सामुग्री आणि तिच्या कथेची एकंदर पार्श्वभूमी व वातावरण आणि तिच्यातील व्यक्तींची नांवें, हीं पाहिलीं म्हणजे ही पूजा व कथा बंगाल्यांत उद्भवलेली आहे, असें उघड उघड दिसतें. कलकत्याचे सुप्रसिद्ध इतिहास संशोधक महामहोपाध्याय पंडित हरप्रसाद शास्त्री[८] यांच्या मतें तर ही पूजा मुळांत 'सत्यपीरेर पूजा' (सत्यपीराची पूजा) म्हणून प्रचलित होती आणि आजही ती बंगाल्यांत त्याच नांवानें कांही ठिकाणी करण्यांत येते. देव इथून तिथून सर्वत्र एकच आहे, अशी प्रामाणिक समजूत असणाऱ्या आम्ही हिंदूंनी[९] त्या सत्यपीराला सत्य-

८. "It is a very modern work. The worship of Satya-Narayan has a Muhhammadan origin. It was originally and even now in many places, called Satya-Pirer Puja. . ."
—A descriptive catalogue of Sanskrit manuscripts in the Government collection under the care of Asiatic Society of Bengal – Mahamahopadhya Haraprasad Shastri, Vol. V. Preface, page lxv.

९. याची अत्यंत हृद्य अशी एक साक्ष, स्वेन हेडिन या स्वीडिश प्रवाशाच्या, Trans-Himalaya, [...पुढें चालू]

नारायण बनविलें असलें पाहिजे, असें त्यावरून साहजिकच अनुमान निघतें.

आमचा नारायण म्हणजे परमात्मा सत्य अतएव शाश्वत स्वरूपाचा असल्याकारणानें त्याला सत्यनारायण म्हणण्यांत कांहीच बिघडलें नाहीं. पण बिघडलें तें हें कीं, त्या निर्गुण निराकार परमात्म्याला या लोकांनीं नवसाला पावणाऱ्या एका क्षुद्र देवतेचें स्वरूप या प्रकारांत प्राप्त करून दिलें आहे! संतती नसेल, सत्यनारायण बोला; व्यापारांत फायदा हवा असेल, सत्यनारायणाला गाऱ्हाणें घाला; फार काय, प्रतिस्पर्ध्यावर जय मिळवून प्रमोशन हवें असेल, सत्यनारायण करायचें मनांत ठरवा; सत्यनारायण देव हटकून तुम्हाला तुमच्या इच्छित वस्तु देईल! पण ध्यानांत ठेवा, सत्यनारायणाचा संकल्प करून तो पार

[मागील पानावरून पुढें चालू...]

या मानससरोवराच्या प्रवासवर्णनात्मक ग्रंथांत (१९१०) पहावयास सांपडते. तो म्हणतो, "Here (म्हणजे मानससरोवराच्या सभोंवार असलेल्या भागांत) it is singular that the Hindu pilgrims seem to hold the Lamanistic monastaries in veneration, at least I saw them bow before the Lamanistic Gods in Tingn Gompa (१३-१४००० फुटावर) and place handful of rice in the bowl which a monk held out to them," p. 152.

निरागस जनतेच्या डोक्यांत धर्मभेदाचें वेड मुद्दाम निर्माण करणारे आमचे महाभाग जरा अंतर्मुख बनून असल्या अवस्थांच्या साक्षींचा जरा थंडपणें विचार करोत, हीच परमेश्वराची प्रार्थना.

न पाडल्यास मात्र तो देव हां हां म्हणतां तुम्हाला धुळीस मिळवील, तुमची नौका बुडवील, शंभर पुत्रांना रातोरात मृत्युमुखीं पाठील आणि तुमचें राज्य शत्रूकरवीं हरण करील!

हर हर, मुळांत सच्चिदानंद स्वरूपी असलेल्या ज्या परमात्म्याच्या प्रतिकांच्या आराधनेनें, बुद्धीची शुद्धता परिस्थितीशीं झगडण्याचें सामर्थ्य आणि मनाला प्रसन्नता प्राप्त होऊन जीवनमात्राविषयीं प्रेम निर्माण व्हावें, त्याच प्रतीकाला केवळ स्वतःच्या प्रापंचिक लाभासाठीं काय हें हिणकस व किळसवाणें स्वरूप आपण आणून दिलें आहे!

सत्यनारायणाची प्रचलित कथा वाचा; तो देव नवस फेडणारांच्या बाबतींत जितका दातृत्वान, तितकाच नवस, बुद्ध्या नव्हे तर केवळ अनवधानानेंही, न फेडणारांचे बाबतींत, रागीट आणि खुनशी असल्याचें पदोपदीं आपल्याला आढळून येईल. अशी ही कथा नुसती कानीं पडल्यावरही, पंचगव्य च किंवा तें नसेल, तर निदान गोमुत्र तरी पिऊन पापाचें प्रायश्चित्त घेतलें पाहिजे.

आमच्या सुहृद वाचकांवर तसा प्रसंग येऊं नये म्हणून बुद्धीची शुद्धता, मनाची स्थिरता आणि एकंदर प्रसन्नता प्राप्त होऊन मांगल्यवर्धक होईल अशी सत्यनारायणाची सोज्वळ कथा निर्माण करण्याच्या प्रयत्नांत आम्ही गेलीं अनेक वर्षें होतो. सुदैवानें आतां ती तयार झाली असून या अंकासमवेत आपणाकडे सादर भेटीच्या स्वरूपांत धाडली जात आहे.

स्वतःच्या प्रापंचिक लाभासाठीं करावयाचें एक काम्य व्रत नव्हे तर,

"सर्वेषां मानवानां च क्षेत्र–स्थैर्य–आयु: आरोग्य – संतति – समृद्धि – सुख – शान्त्यर्थं सर्वत्र आनंद–उत्साह–निर्माणार्थेच कृतज्ञता-पूर्वक... षोडशोपचारैः पूजनं करिष्ये—असा संकल्प करून केलेली श्रीसत्यनारायणाच्या सोज्वळ पूजेची पोथी, सद्धर्मानें आपणाकडे जुलै–ऑक्टोबर १९७४ च्या अंकासमवेत धाडली होती. आतां धाडीत असलेली त्या पूजे नंतर वाचावयाची तशीच सोज्वळ पोथी आपणास आवडेल असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

पूजे नंतर पूर्वीच्या पोथी ऐवजीं हीच कथा वाचली जावी अशी आपणापाशीं आमची हात जोडून प्रार्थना आहे.

"या ठिकाणीं स्वामी विवेकानंदांचे पुढील उद्गार लक्षांत घेण्यासारखे आहेत."

मृत्यूपूर्वी थोडेच दिवस आधीं लिहिलेल्या एका पत्रांत स्वामी विवेकानंदांनीं म्हटलें होतें कीं,

"If in this hell of the world, one can bring a little joy and peace, even for a day into the heart of a single person, that much alone is true. This I have learned after suffering all my life. All else is mere moon-shine."

"नाना प्रकारें दुःखांनीं गांजलेल्या या जगांत जर कुणी एखाद्याला घटकेपुरतें तरी थोडेसें सुख व शांती मिळवून देईल, तर तेंच तेवढें खरें असें मी म्हणेन. बाकीच्या साऱ्या गोष्टी व्यर्थ आहेत. जन्मभर हाल अपेष्टा सहन करून जर मी कांही शिकलों असेन तर तें हेंच होय."

स्वामीजींनी अत्यंत क्लेशानें काढलेले हे उद्गार सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वीचे आहेत. त्यानंतरची जगाची अवस्था अधिकच बिकट झालेली आहे.

अशा अवस्थेत श्रीसत्यनारायणाची पूजा मनःपूर्वक निरागसपणें सर्व आप्तेष्ट व मित्र-बांधवांसह केल्यास तेवढा काळ पर्यंत तरी जीवनांतील खरा—सात्विक आनंद मिळेल असा आम्हाला भरंवसा आहे.

या सत्यनारायणपूजेची व कथेची त्या दृष्टीनें दिवसेंदिवस वाढ होवो हीच ह्या सच्चिदानंद स्वरूपी परमात्म्याच्या चरणीं आमची प्रार्थना आहे.

॥ ॐ शुभं भवतु ॥

१०. Swami Vivekananda: His Second Visit to the West, New Discoveries (1973). p. 733.

## केवळ स्वतःचाच विचार करणारा....

प्राचीन ग्रीक लोक राजकारणांत भाग घेण्याबाबत अत्यंत दक्ष असत. तसें नसणारांचा ते तिरस्कार करीत व त्यांना idiot (इडिअट) म्हणत. इडिअट या शब्दाचा मूळ अर्थ, केवळ स्वतःचाच विचार करणारा माणूस, असा होता.

गिरगावांत देणगी हातीं देण्याचा पत्ताः-
**श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**
कापडाचे व्यापारी.
४८ प्रार्थना समाज नाका, गिरगांव मुंबई ४

दादरला देणगी हातीं देण्याचा पत्ताः-
**श्री गंगाधर प्रिंटिंग प्रेस**
वेस्टर्न रेल्वे फूटब्रिजच्या समोर
दादर, मुंबई २८

# सूत हवेंत उभें राहिलें....

एक दिवस कबीर आपल्या घरांत मागावर कापड विणत बसला होता. नेहमीप्रमाणें अंतर्यामीं प्रभु रामचंद्राचें चिंतन चालूच होतें. अशावेळीं त्याचा एक शिष्य घाई-घाईनें त्याच्याजवळ आला आणि त्याला म्हणाला, "साईंजी लवकर बाहेर रस्त्यावर चला. एका माणसानें आपला लांबलचक बांबू आधाराशिवाय हवेंत सरळ उभा केला आहे. तें पाहायला लोकांची कितीतरी गर्दी लोटली आहे. तुम्हींही लवकर चला."

पण कबीर आपल्या तंद्रींत होता. त्यानें शिष्याकडे लक्ष च दिलें नाहीं. तेव्हां शिष्यानें त्याला बाहेर चलण्याची पुन्हा घाई केली. त्याची आर्तता पाहून कबीर अखेर त्याच्या-बरोबर रस्त्यावर गेला. विणत असलेल्या सुताचा गुंडा कबीराच्या हातांत तसाच राहिला होता.

बाहेर आल्यावर शिष्यानें तेथील गर्दींतून बांबू हवेंत उभा करणाऱ्या त्या माणसापाशीं कबीराला नेलें. बांबू अजून हवेंत उभा च होता. तें पाहून कबीरानें आपल्या हातांतील सुताचा गुंडा अगदीं सहजरीत्या हवेंत थोडा वर फेकला. तो काय! गुंडा भराभर उकलत जाऊन त्यांतील सूत त्या उभ्या असलेल्या बांबूप्रमाणेंच पण कितीतरी उंचवर हवेंत गुंडा संपेपर्यंत ताठ उभें राहात गेलें.

तें पाहून त्या बांबूवाल्याचें तोंड खारकन् उतरलें आणि आतांपर्यंत बाजूला जमलेले लोक जे त्या बांबूवाल्याचा उदो उदो करीत होते तो थांबवून, त्यांनीं कबीराचा जयजय-कार करण्यास आतां सुरवात केली. तेव्हां कबीर बिचारा शिष्यासमवेत मुकाट्यानें घरांत येऊन बसला. त्याचें मुख म्लान दिसत होतें.

तें पाहून शिष्य भीतभीत कबीराला म्हणाला, "साईंजी, त्या बांबूवाल्याच्या मानानें आपण केवढा तरी मोठा चमत्कार करून दाखविला. तो पाहून लोकांनीं मोठ्या आनंदानें आपला जयजयकार सुरू केला. तर आपण असे म्लान कां?"

कबीरानें उत्तर दिलें, "बाबारे, मी बुद्ध्या कांहीच केलें नाहीं. माझ्या हातांतील गुंडा केवळ यदृच्छेनें वर फेकला गेला आणि सूत हवेंत उभें राहिलें. पण त्यामुळें त्या बांबू-वाल्याचा लोकांनीं पाणउतारा केला म्हणून मला वाईट वाटतें. तर माझ्याबरोबर बाहेर चल. त्या बांबूवाल्यापाशीं जाऊन मला त्याची क्षमा मागायची आहे. माझ्यामुळें बिचा-ऱ्याला खालीं पहावें लागलें."

पण त्या बांबूवाल्यानें तेथून केव्हांच पलायन केलेलें होतें हें आपल्या त्या कबीराला काय ठाऊक. असो.

वरील घटना अत्यंत विचारार्ह आहे. खऱ्या साधुसंतांना नाना प्रकारच्या सिद्धि प्राप्त झालेल्या असतात. पण त्यांचा बुद्ध्या उपयोग करून ते कधीं ही लोकांना चमत्कार करून दाखवीत नसतात. किंबहुना सिद्धींचा उपयोग करूं नये असा त्यांचा दंडक आहे. पण परमेश्वर देवकार्यासाठीं कधीं कधीं संतांकरवी चमत्कार करवून दाखवीत असतो. तसें झालें तर संतांना त्या चमत्काराच्या कर्तेपणाचा अभिमान मात्र मुळींही नसतो, एवढेंच नव्हे तर हातून चमत्कार घडले म्हणजे त्याबद्दल त्यांना नेहमीं खंतच वाटत असते.

---

उपासना—उप आस्यते अनया इति उपासना—जिच्यामुळें आपण परमेश्वराच्या जवळ जातो ती उपासना होय.

# अविस्मरणीय व्यक्ति....

आमचे डॉक्टर अण्णा म्हणजे तशी च एक व्यक्ति होती. त्यांच्या प्रत्येक पेशंटला वाटे कीं डॉक्टर आपली व्यक्तिशः काळजी घेतात आणि आपल्याला स्पेशल ट्रीटमेंट देतात. पण खरें म्हणजे सर्वांशीं च ते तसे वागत. मात्र एकाची गोष्ट ते दुसऱ्याबद्दल बोलत नसत. अबोल म्हणून त्यांची प्रसिद्धी होती.

एकदां आमच्या भाऊंच्या पोटांत भयंकर दुखूं लागलें. नेहमींच्या डॉक्टरांनी त्यांना तपासलें आणि ते म्हणाले, "भाऊ, ही सर्जिकल केस आहे. कुणातरी चांगल्या सर्जनाला तावडतोब बोलावलें पाहिजे. कुणाला बोलावूं?"

भाऊ म्हणाले, "मी काय सांगूं. डॉक्टर-साहेब, तुम्हाला हवं त्याला बोलवा."

डॉक्टरसाहेब म्हणाले, "तर मग मी डॉक्टर अण्णांना बोलावतों. आज मुंबईतले ते टॉप सर्जन आहेत. त्यांना वेळ मात्र मिळायला हवा."

सुदैवाने डॉक्टर अण्णांनी दुसऱ्या च दिवशीं सकाळीं भाऊंना पाहायला येण्याची वेळ दिली. ठरल्यावेळीं नेहमींचे डॉक्टर आले आणि पाठोपाठ डॉक्टर अण्णा ही आले. अण्णांनी एकदां भाऊंकडे पाहिलें आणि कांहींही न बोलतां त्यांना तपासून ते नेहमींच्या डॉक्टरांना गंभीर आवाजाने म्हणाले, "डॉक्टर, तावडतोब ऑपरेशन केलेलं बरं. पेशंटची तयारी आहे का?"

नेहमींचे डॉक्टर म्हणाले, "होय, आहे. केव्हां करतां?"

त्यावर अण्णा म्हणाले, "मी थोड्या वेळानें माझ्या हॉस्पिटलांत जात आहें. खोली रिकामी आहे का पाहून फोन करतों." आणि असें म्हणून ते जायला उठले. परत जातांना त्यांनी भाऊंकडे मागें वळून नुसतें पाहिलें ही नाहीं!

त्यांच्या पाठोपाठ आमचे नेहमींचे डॉक्टर ही गेले. पण तत्पूर्वी तेवढ्या घाईत ही भाऊंच्या मंडळींनीं त्यांच्या हातीं अण्णांच्या फीचें पाकीट दिलें. तेव्हां त्यांनीं जातांजातां अण्णांच्या पुढें केलें. तें पाहून अण्णा म्हणाले, "हें काय?"

डॉक्टर म्हणाले, "ही तुमची फी."

तें ऐकतांच अण्णा थोडे रागावून च म्हणाले, "काय, मी भाऊंबद्दल फी घेऊं! अहो, तुम्हाला माहीत नसेल, पण मी भाऊंचें थोडं देणं लागतों आहें. मी भाऊंना विसरलों नाहीं."

डॉक्टर चुप्प च झाले. मग अण्णांना त्यांच्या गाडींत बसवल्यावर, ते परत आले आणि भाऊंना म्हणाले, "काहो, भाऊ, हा काय प्रकार आहे. डॉक्टर अण्णा तुमचं काय देणं लागतात? त्यांना बोलावूं का असं काल मी तुम्हाला विचारलं, तेव्हा त्यांची न् तुमची ओळख आहे, एवढं सुद्धां तुम्ही बोलला नव्हतां. "आणि असें म्हणून त्यांनी फीचें पाकीट भाऊंच्या उशीखालीं ठेवलें.

सद्गदित होऊन भाऊ त्यांना म्हणाले, "काय सांगूं, डॉक्टरसाहेब. तीसबावीस वर्षांपूर्वी अण्णा शिकत होते. त्या कॉलेजांत मी शिक्षक होतों. आतां एवढं नांव आणि पैसा मिळवल्या-वर ते माझी नुसती ओळख तरी दाखवतील कीं नाहीं याची मला खात्री नव्हती. म्हणून मी तुम्हाला त्याबद्दल कांहीं बोललों नाहीं." आणि हें म्हणतांना भाऊंच्या डोळ्यांत पाणी आलं तर नवल नाहीं. असो.

थोड्या वेळानें, "खोलीची व्यवस्था केली आहे, पेशंटला घेऊन या," असा अण्णांचा फोन आला आणि त्याप्रमाणें भाऊंना त्यांच्या हॉस्पिटलांत नेण्यांत आलें. ऑपरेशन दुसऱ्या दिवशीं सकाळीं अकरा वाजतांना करण्याचें ठरलें. पण ती वेळ सांगताना अण्णा म्हणाले, "उद्यां सकाळपासून माझी ऑपरेशनें ठरलेलीं आहेत. अकरा वाजतां मला वेळ मिळेल. ती तुम्हाला चालेल ना? का तुम्हाला पंचांग वगैरे कांही पाहायचें आहे. तसें असेल तर सांगा, त्याप्रमाणें मी वेळ देईन."

हें ऐकून भाऊंच्या बरोबर असलेल्या सर्वांच्या तोंडावर प्रश्नचिन्ह उमटलेलें पाहून, अण्णा लगेच पुढें म्हणाले, "माझं हें विचारणं ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटणं साहजिक आहे. मी नास्तिक आहें खरा. पण पेशंटांना जर शुभदिवस, काळवेळ वगैरे कांहीं पाहायचें असेल, तर माझी हरकत नसते. माझा नास्तिकपणा मी दुसऱ्यांवर लादूं इच्छित नाहीं.

तें ऐकून भाऊंनीं शांतपणें उत्तर दिलें, "नाहीं अण्णा, आम्हाला मुहूर्त वगैरे कांहीं पाहायचें नाहीं. तुम्हाला जी वेळ मिळेल, तोच आमचा मुहूर्त."

डॉक्टर अण्णा स्वतः पक्के नास्तिक असले तरी ते पेशंटांच्या भावनांना मान देत असत. इकडे थिएटरमध्ये डॉक्टर पेशंटचें ऑपरेशन करीत आहेत तर तिकडे त्याच्या खोलींत भटजी पूजापाठ वाचीत आहेत, असें दृश्य पुष्कळदां दिसे. अण्णांची त्याला हरकत नसे.

पण तें पाहून व्हाल्तेअरची आठवण येई. तो आपल्या मित्रांना म्हणे, "मला तुमची मतें मान्य नसलीं तरी तीं असण्याचा तुम्हाला हक्क आहे आणि तुमच्या हक्काच्या संरक्षणार्थ मी माझ्या शरीरांत रक्ताचा अखेरचा थेंब असेपर्यंत तुमच्या बाजूनें लढेन." असो.

इतर सर्व कार्यें आटोपल्यानंतर रात्रीं घरीं जाण्यापूर्वी एकदा प्रत्येक पेशंटच्या खोलींत जाऊन त्याला पाहायचें असा अण्णांचा एक नियम होता. त्या वेळीं पेशंटच्या केसचे कागद घेऊन त्यांची एक नर्स त्यांच्याबरोबर असे.

आमचे भाऊ त्यांच्या हॉस्पिटलांत जवळ-जवळ चाळीस दिवस होते. अण्णा त्यांच्या खोलींत सर्वांच्या शेवटीं यायचे. भाऊंची प्रकृती पाहिल्यावर बरोबरच्या नर्सला, तूं आतां बाहेर जा म्हणून नुसता डोळ्यांचाच अण्णा इशारा करायचे. ते अबोल होते हें मागें सांगितलेंच आहे. मग बिचारी ती नर्स बाहेर गॅलरींत उभी आणि डॉक्टर अण्णा भाऊंशीं उभे राहूनच अर्धा अर्धा तास बोलत राहात. बिचारी नर्स बाहेर उभी राहून कंटाळून जायची.

एकदां एकीनें भाऊंना विचारलें, "काहो साहेब, आमचे डॉक्टर अबोल आहेत. कुणाशीं फारसे बोललेले आम्हीं पाहिले नाहींत. पण ते तुमच्या खोलींत येऊन रोज असें बोलतात तरी काय?

भाऊंनीं उत्तर दिलें, "सिस्टर तुम्ही अजून लहान आहांत. तुम्हांला त्याची कल्पना यायची नाहीं. डॉक्टर येथें आले म्हणजे लहानपणापासूनच्या साऱ्या आठवणी त्यांना येतात आणि त्याबद्दल आम्ही बोलत असतों."

कांही वेळां तर बोलताना अण्णांच्या आतड्यांना पीळ बसे. एकदां बावीस सालच्या लढ्यासंबंधी बोलत असतां ते म्हणाले, "भाऊ, त्यावेळी आपण एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून ब्रिटिशांशी झगडलो, तें आज चालू आहे त्या स्वराज्यासाठीच का ! तें पाहून इतका संताप येतो की वाटतें, हातांत..." हें बोलत असतां अण्णा सात्विक संतापानें इतके थरथरूं लागले की पुढें त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडेनासे झाले.

एरव्ही अत्यंत कडक असलेले अण्णा तसे अत्यंत हळव्या स्वभावाचे होते. बरा होऊन एखादा पेशंट घरीं जाताना म्हणाला की, डॉक्टर, माझी ओढ आहे तेव्हां आपलें बिल पुढें मागें करून दिलें तर चालेल का, तर ते लगेच त्याला म्हणत, "कांही काळजी करूं नका. हवें तेव्हां द्या."

आणि कुणी म्हणाला, "डॉक्टर, आपलं बिल फार झालं आहे, माझी तितकी ताकद नाही हो,..." तर डॉक्टर त्याला अधिक बोलूं न देतां म्हणत "कांही हरकत नाही, तूं मुळींच तें दिलं नाहींस तरी चालेल. तूं बरा होऊन घरी जात आहेस, त्यातच मला आनंद आहे."

विद्यार्थ्यांच्या बाबतींत तर ते अधिकच हळवे होत. त्यांचा एखादा विद्यार्थी येऊन म्हणाला, "सर, मला F.R.C.S. साठी विलायतेला जायचें आहे, काय करूं !" तर अण्णा लगेच त्याला चेक फाडून देत. अशी कितीतरी विद्यार्थ्यांना त्यांची मदत झालेली होती. आणि असें असूनही कुठेंही त्याची वाच्यता होत नसे. अण्णा कमालीचे प्रसिद्धिपराङ्मुख होते.

अशा त्या आमच्या डॉक्टर अण्णांचा एकदां परिचय झाल्यावर कुणी कधींही त्यांना विसरलें नाही तर त्यांत नवल तें कसलें !

# आमचं जगणं अनंतांत....

स्वामी विवेकानंद कॅलिफोर्नियांत असतांना एकदां त्यांना व्याख्यान देण्यासाठीं जवळच्या दुसऱ्या एका गांवीं जायचें होतें. प्रवास आगगाडीनें करायचा होता. म्हणून स्टेशनवर जाण्यासाठी ते आपल्या एका अमेरिकन मित्राबरोबर निघाले.

त्या दिवशीं स्वामीजींना काय झालें होतें कुणास ठाऊक ! ते अगदी मंदगतीनें चालत होते. तेव्हां मित्र त्यांना म्हणाला, "स्वामीजी, आपल्याला जरा घाई केली पाहिजे. गाडी चुकली तर तासभर दुसरी गाडी नाही. व्याख्यानाला फार उशीर होईल."

पण स्वामीजी आपल्याच नादांत होते. त्यांनीं मित्राच्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाही. पुन्हा मित्रानें चाल वाढविण्याविषयी सुचविलें. तरीही स्वामीजींनीं त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाही. तेव्हां तो चिडून त्यांना म्हणाला, "स्वामीजी, तुम्हा हिंदी लोकांना वेळेचें भान नसतें."

स्वामींनी पटकन उत्तर दिलें, "तुम्ही ठोक वेळेच्या बंधनांत जगतां; पण आमचं जगणं अनंतात—शाश्वतात असतं."

स्वामीजी त्या वेळीं आपल्या 'सहज स्थितींत' म्हणजे 'आत्मस्थितींत' होते, हें त्या अमेरिकनाला काय ठाऊक.

पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, तशा त्या मंद गतीनें जाऊनही अखेर त्यांना गाडी मिळाली. कारण मध्यंतरीं कुठें खोळंबा झाल्यानें ती त्या दिवशीं लेट होती !

# गरज सबसे प्यारी....

"बिरबल, माणसाला सर्वांत अधिक प्रिय काय आहे?" बादशाहानें एकदा बिरबलाला प्रश्न टाकला.

बादशाहाचा प्रश्न! त्यांत कांहीतरी खोंच असणारच. तेव्हां उत्तर विचार करून दिलें पाहिजे, असें वाटून बिरबलानें बादशाहाकडून उत्तरासाठीं तीन दिवसांचा अवधी मागून घेतला. आणि मग उत्तराच्या शोधासाठीं सारा दिवस वणवण हिंडला. ग्रंथालयें धुंडली, मुल्लामौलवींच्या गांठीभेटी घेतल्या, फार काय घरांत बायकोलाही त्यानें विचारलें. पण समाधानकारक उत्तर मिळेना.

तेव्हां मग कंटाळून संध्याकाळच्या वेळीं डोकें शांत करण्यासाठीं तो नदीवर गेला. तेथें नदीकांठीं पाण्याचें पितर असा एक अवलिया (फकीर) आपला सल आणि बचा हातीं घेऊन भांग घोटत बसला होता. याच्याकडून आपला कार्यभाग नक्की होईल, असें एकदम मनांत घेऊन, बिरबल त्याच्या जवळ जाऊन अदबीनें वाकून बसला.

अवलिया आपल्याच नादांत होता. त्यानें प्रथम बिरबलाकडे लक्षही दिलें नाहीं. बऱ्याच वेळानंतर तो बिरबलाला म्हणाला, "ए पागल, इथं कशाला बसला आहेस!" बिरबलानें नम्रपणें उत्तर दिलें, "मुल्लाजी, माझा एक सवाल आहे."

अवलिया खसकन चिडून म्हणाला, "चालता हो इथून. मला सवाल नकोत." आणि असें म्हणून त्यानें हातांतील बचा बिरबलाला मारायला उगारला.

पण बिरबलाला अशा लोकांची नाडी ठाऊक होती. तो कांहीही न बोलतां मुकाट्यानें हात जोडून तेथें बसून राहिला. अवलिया भांग घोटण्याच्या पुन्हा रंगांत आला. सूर्यास्ताची वेळ होत आहे, असें पाहून बिरबल मुकाट्यानें तेथून उठून घरीं परत गेला. पण आतां त्याच्या मनानें पक्कें घेतलें की येथें आपली डाळ शिजेल. म्हणून तो दुसऱ्या दिवशींही संध्याकाळीं पुन्हा त्या जागीं गेला. आदल्या दिवसाप्रमाणेंच प्रकार घडला. पण बिरबलानें चिकाटी सोडली नाहीं.

तिसऱ्या दिवशींही तेथें जाऊन अवलियापुढें पूर्ववत हात जोडून तो मुकाट्यानें बसला. बादशाहाला उत्तर द्यावयाचें त्याचा हा तिसरा दिवस होता. आज कांहीतरी सोक्षमोक्ष करून घ्यायला हवा होता. म्हणून सूर्यास्ताची वेळ झाली तरीही तो तेथें बसूनच राहिला.

अवलियानें इतका वेळ त्याच्याकडे लक्षही दिलें नव्हतें. आपली भांग घोटण्यांतच तो गर्क होता. पण सूर्य आतां अगदी अस्तास जात आहे असें पाहून तो एकदम बिरबलाकडे पाहून म्हणाला, "ए पागल, आतां माझी नमाज पढायची वेळ झाली आहे. पण आज माझे पाय दुखत आहेत. तर मला आपल्या खांद्यावर बसवून, समोर ती पडकी मशीद आहे तेथें घेऊन चल. तेथें गेल्यावर मी आपला नमाज पढेन आणि मग तूं आपला सवाल विचार. मी तुला उत्तर देईन."

बिरबलाच्या मनांत आतां आशा निर्माण झाली. मुकाट्यानें त्या अवलियाला आपल्या खांद्यावर बसवून त्यानें सांगितल्याप्रमाणें तो त्याला मशीदीकडे घेऊन जाऊं लागला. अवलियानें आपला सल त्याच्या डोक्यावर ठेवला आणि एका हातानें तो घट्ट धरून दुसऱ्या हातानें त्यानें त्यांतील भांग घोटण्यास सुरुवात केली. थोड्या वेळानें तारेंत

घेऊन तो गाऊं लागला :

"गरज सबसे प्यारी बाबा,
गरज सबसे प्यारी"

हें कानीं पडतांच बिरबलानें खांद्यावर बसविलेल्या त्या अवलियाला त्याच्या गाठोड्यासह धाडकन खालीं टाकलें आणि सरळ गांवाकडे बादशाहाला त्याच्या सवालाचा जबाब देण्यासाठीं धांवत सुटला. पण बादशाहा थोड्याच अंतरावर एका झाडाच्या आड त्याच्या पाळतीवर उभा होता. बिरबल धांवत येत आहे, असें पाहून तो पुढें आला आणि त्यानें बिरबलाला म्हटलें,

"माझ्या सवालाचें उत्तर मिळालें का ? आज मुदत संपते आहे."

बिरबलानें क्षणाचीही अवधी न लावतां उत्तर दिलें, "होय सार्वभौम, गरज सबसे प्यारी, बाबा गरज सबसे प्यारी."

बादशाहा म्हणाला, "होय बिरबल, अगदी खरें आहे. तसें नसतें तर त्या वाण्याच्या पिराला आपल्या खांद्यावर बसवून डोंगरावर भीक कशाला घोटूं दिली असतीस !"

अवलियानें केलेला आपला सारा तमाशा बादशाहानें पाहिला आहे, असें कळतांच बिरबल अतिशय खजील झाला. पण लगेच आपल्या मनांत म्हणाला, "होय, तसें नसतें तर बादशाहा तरी या अशा वेळीं इथें रानांत झाडाआड लपून कशाला उभा राहिला असता." या विचारानें थोडें समाधान पावून तो मोठ्यानें म्हणाला

"गरज सबसे प्यारी बाबा,
गरज सबसे प्यारी"

# शुद्ध आणि निरपेक्ष....

प्रेम या शब्दाच्या अर्थाचा सध्यां इतका चिचका झालेला आहे कीं कोणत्या अर्थानें तो पुढें वापरूं म्हटलें तर भीतीच वाटते. त्या दृष्टीनें प्रेम या शब्दानें व्यक्त होणाऱ्या भावनेंत ज्या वेगवेगळ्या छटा आहेत त्या दर्शविण्यासाठीं ग्रीक भाषेंत जे निश्चित असे तीन शब्द आहेत, ते ध्यानात ठेवण्यासारखे आहेत.

Eros एरॉस, Philia फिलिआ आणि Agapa अगपा असे ते तीन शब्द होत. त्यांचे भिन्न भिन्न अर्थ पुढीलप्रमाणें आहेत.

एरॉस म्हणजे रसिक (aesthetic) अथवा कादंबऱ्यांतील चमत्कारपूर्ण (romantic) प्रेम.

फिलिआ म्हणजे सापेक्ष (reciprocal) अथवा ज्यांत देवघेव होते तें प्रेम.

अगपा म्हणजे अंतर्यामीच्या उमाळ्यानें सहजरीत्या प्रगट होणारें सर्व भूतमात्रांविषयींचें शुद्ध आणि निरपेक्ष प्रेम. आत्मानंदाचा ज्याचा अनुभव येतो त्या आनंदाचेंच हें पार्थिव स्वरूप असतें. त्याला दैवी प्रेम म्हणतां येईल.

हे तीन शब्द ग्रीक न्यू टेस्टामेंटमध्यें दिलेले असून मार्टिन ल्युथर किंग यांनीं आपल्या 'Stride Toward Freedom' या पुस्तकांत उधृत केले आहेत. (पृ. १०४)

अशा प्रकारचे तीन वेगवेगळे शब्द मराठी भाषेंत निर्माण झाले तर फार उत्तम होईल.

# राजाच्या डोळ्यांत अंजन....

एक तरुण राजा राज्यकारभाराकडे मुळींही न पाहतां आपला सारा वेळ ऐशआरामांत घालवीत असे. एकदां आपल्या उद्यानांतील प्रासादाच्या गच्चीवर तो आपल्या राणीशीं गप्पा मारीत बसला होता. समोर सुवर्णाच्या ताटांत सिद्धलेली केळीं ठेवलेलीं होतीं आणि त्यांतील एक एक घेऊन तो तें सोलून खात होता आणि केळ्यांचीं सालें खालीं बागेंत फेंकीत होता.

तेथें खालीं एक साधु बसलेला होता. केळ्याचें साल खालीं पडलें की तें घेऊन तो चोखत होता. राणीचें तिकडे लक्ष गेलें आणि उद्यानांत बाहेरच्या कुणाही माणसाला फिरूं देऊं नका अशी द्वारपालांना सक्त ताकीद असतांही हा साधु तेथें बसलेला पाहून तिला आश्चर्य वाटलें आणि तिनें राजाच्या नजरेस ती गोष्ट आणली. तेव्हां राजाने लगेच द्वारपालाला बोलावून त्या साधुला उद्यानांत येऊं दिल्याबद्दल त्याची कानउघाडणी केली.

द्वारपालानें राजाचें म्हणणें मुकाट्यानें ऐकून घेतलें आणि खालीं जाऊन, त्या साधूवर गुरगुरून तो त्याला तेथून हाकून देऊं लागला. पण साधूनें तिकडे मुळीच लक्ष दिलें नाहीं. साली चोखून खाण्याचा त्याचा उद्योग संथपणें चालूच होता. तें पाहून द्वारपाल चिडून त्याला शिवीगाळ करूं लागला. आणि तरीसुद्धां साधु तेथून हालत नाहीं असें पाहून त्यानें त्याच्याशीं धक्काबुक्की सुरू केली. तरीही साधूवर त्याचा कांहींही परिणाम झाला नाहीं.

राजा गच्चीवरून हा सारा प्रकार पाहात होता. त्याला साधूच्या वर्तनाचें आश्चर्य वाटून तो स्वतः खालीं आला आणि त्याला म्हणाला, “काय रे, द्वारपालानें तुझी इतकी निर्भर्त्सना केली, धक्काबुक्कीही केली, तरी तूं तसाच येथें साली चोखत बसला आहेस, याचा अर्थ काय?”

राजाचें बोलणें ऐकून साधु वेड्यासारखा स्वतःशीच हसूं लागला. आतां मात्र राजाला त्या साधूची चीड आली आणि तो त्याला संतापानें म्हणाला, “काय रे, इतकी मार-हाण खाली तरी तूं येथून जात नाहीस, उलट माझ्याकडे पाहून वेडारमपणें हंसतो आहेस, तर तुला काय म्हणायचें?”

साधूनें हंसून उत्तर दिलें, “महाराज, केळ्यांच्या नुसत्या साली चोखल्याबद्दल मला इतकी शिवीगाळ आणि मारहाण; तर प्रत्यक्ष केळीं खात रिकामटेकडेपणें बसणाऱ्या तुम्हाला काय शिक्षा हवी, असा विचार मनांत येऊन मला हसूं आलें. तुम्हांला नकोच आहे तर मी चालता जातों इथून. देव तुमचें भलें करो.” आणि असें म्हणून साधु संथपणें तेथून जाण्यासाठीं निघाला.

मात्र साधूचें उत्तर ऐकून आणि त्याची ती शांत वृत्ति पाहून राजाच्या मनांत एकदम प्रकाश पडला आणि हा कोणी तरी ज्ञानी पुरुष आहे अशी खात्री वाटून त्यानें त्याचे पाय धरले. तेव्हां साधु त्याला म्हणाला, “बेटा, आपला राज्यकारभार पाहाण्याचें सोडून तूं रिकामटेकडेपणें केळीं खात बसतोस म्हणून माझ्यासारख्या तुझ्या प्रजेवर आज साली चोखून खाण्याची पाळी आली आहे. याचा विचार कर. सुद्धीवर ये” आणि असें म्हणून, राजा त्याची थांबण्यासाठीं हात जोडून विनवणी करीत असतांही, साधु तेथून निरपेक्षपणें निघून गेला.

या प्रकारामुळें राजाच्या डोळ्यांत अंजन पडून त्यानें आपला जीवनक्रम सुधारला, हें सांगायलाच नको.

# मुक्ति हवी आहे ना ?....

एकदां रामदासस्वामी शिष्यांशीं बोलत बसले असतां कांही शिष्य त्यांना उत्कंठेनें म्हणाले, "स्वामी, आम्हाला मुक्ति कशी मिळेल तें सांगा."

स्वामींनीं गंभीर मुद्रा करून आपला उजवा हात शिष्यांपुढें पसरला आणि आवर्जून ते त्यांना म्हणाले, "या तुम्हांला मुक्ति हवी आहे ना ? पुढें या. इथं या घटकेला मीं तुम्हाला ती देतों. या माझ्या हातांत मुक्ति देण्याचं सामर्थ्य आहे."

पण कोणीही शिष्य पुढें आला नाहीं. स्वामींनीं त्रिवार अवाहन केलें आणि कोणीहि पुढें येत नाहीं, असें पाहून अखेर आपला हात मागें घेत ते म्हणाले, "देऊं केलेली मुक्ति मी आतां मागें घेत आहें."

ही हकीकत अत्यंत बोलकी आहे. आपण मुक्तीच्या गोष्टी बोलतों; पण ती मिळूं लागली तर घेण्याला कोणीही तयार होणार नाहीं. कारण सर्वांना प्रपंच च प्यारा असतो.

आणि मुक्ति हा कांही सोपा विषय नव्हे, हें ध्यानांत ठेवावें. मरेपर्यंत ज्यांना आपण बिलगून असतों, त्या 'मी आणि माझें' या कल्पनांचें संपूर्ण विसर्जन म्हणजेच मुक्ति होय. तें करण्याची तयारी नसणारांनीं मुक्तीच्या गोष्टी बोलणें व्यर्थ आहे.

# ही यातायात कशाला....

एका वडाच्या झाडावर एक घुबड आणि खार अशीं दोघें खेळीमेळीनें राहात होतीं. एक दिवस खारीनें पाहिलें तों घुबड आपलें चंबूगबाळें घेऊन कुठे तरी बाहेर जाण्याच्या तयारीत आहे. तें पाहून तिनें त्याला विचारलें, "दादा, हें सारें घेऊन कुठें चाललांत ?" घुबड म्हणालें, "ताई, माझा आवाज कर्कश आहे म्हणून येथले सारे लोक सदा माझा तिरस्कार करीत असतात. आणि आतां तर ही ब्याद येथून जात कां नाहीं' असें ते माझ्या तोंडावर म्हणूं लागले आहेत. तेव्हां वेळींच येथून दुसरीकडे जाणें बरें."

तें ऐकून खार म्हणाली, "पण दादा, तुमचा तो कर्कश आवाजही तुमच्या बरोबर जाणार आहे. त्यामुळें तुम्ही जाल तेथले लोकही तो ऐकून तुमचा तिरस्कार करूं लागतील आणि थोड्या दिवसांनीं येथल्या लोकांसारखेंच तुमच्या तोंडावर तुम्हाला म्हणूं लागतील तर मग तुम्ही आपला आवाज बदलून इथंच कां राहात नाहीं ? जागा बदलण्याची ही यातायत उगाच कशाला करतां ?"

खारीनें घुबडदादांस केलेला वरील उपदेश जर आपण ध्यानांत ठेवूं तर जीवनांतील बरीचशी यातायत टळेल. नव्हे का ?

# आपली शब्दसंपदा....

सत्य–अस्ति इति सत्–सत्य.

अस्–असणें (पा. २ प.) या धातूपासून सत्य हा शब्द झालेला आहे. अस् म्हणजे असणें, अस्तित्वांत असणें. जे आहे, अस्तित्वांत आहे, शाश्वत आहे, सनातन आहे, जें नाहीं असें कधींच होत नाहीं तें म्हणजेच 'सत्य' होय.

आणि म्हणूनच सत्य म्हणजे परमेश्वर होय.

प्रकाशक; व मुद्रक : अनंत विनायक धोरे, ९ ओवेनडन रोड मुंबई नं. ७
मुद्रण स्थळ : मौज प्रिंटिंग ब्यूरो, गिरगांव, मुंबई ४